बीड ।जालना। छत्रपती संभाजीनगर । पुणे । अहमदनगर,सोलापूर,नागपूर,यवतमाळ → आर. एन. आय. एमएएच /एमएआर / २०१४/ ५८०९० → मंगळवार दि १३ ऑक्टोबर २०२६ → वर्ष १० वे → अंक -१३२ → पाने ४ → किंमत २ रु
Beed /Jalna/ Chatrapati Sambhajinagar / pune / Ahamadnagar → RNI : Regd.No.MAHMAR/2014/58090 → Tuesday Date: 13 October 2026 → 10 th Year → 04 Paper → Pages : 4 → Price - 2 Rupees



## तिसरी माळ

तृतीयेचे दिवशी अंबे शृंगार मांडिला हो ।। मळवट पातळ चोळी कंटी हार मुक्ताफळां हो । कंठीचीं पदकें कारों पीतांवर पिवळा हो ।। अष्टभुजा मिरवती अंबे सुंदर दिसे लीला

महाराष्ट्राचा महानायक

# लोकनायक

संपादक - भारत गायकवाड

# चंपावती शाळेतील विद्यार्थी नोंदींचा घोळ चव्हाट्यावर!

## परराज्यातील व इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांची ऑनलाइन नोंद केल्याचा आरोप

**बीड शहरातील चंपावती शाळेतील विद्यार्थी नोंदणी आणि संच मान्यतेसंदर्भातील कथित गैरप्रकार पुन्हा चर्चेत आला आहे. परराज्यातील विद्यार्थ्यांची यू-डायस प्रणालीवर नोंद केल्याचा तसेच जवळच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांची नावे ऑनलाइन नोंदींमध्ये दाखविल्याचा प्रकार उघडकीस आल्याचा दावा करण्यात आला आहे. या नोंदींच्या आधारे शाळेची संच मान्यता करून अतिरिक्त शिक्षकांची पदे वाचविण्यात आल्याचा आरोप होत असून, शिक्षण विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.**




**लोकनायक वृत्तसेवा** - उत्तराखंड राज्यातील तीन विद्यार्थ्यांची यू-डायस प्रणालीवर नोंद करण्यात आल्याचा प्रकार समोर आला होता. त्याचबरोबर चंपावती इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील जवळपास २०० विद्यार्थ्यांची नावे ऑनलाइन नोंदींशी जोडून संच मान्यता मिळिवण्यात आल्याचा आरोप आहे. या माध्यमातून अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांची पदे कायम ठेवण्याचा प्रयत्न झाल्याचे वृत्तात नमूद करण्यात आले आहे.सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील हजेरी पटावर १,७५३ विद्यार्थी दिसत असताना ऑनलाइन पोर्टलवर मात्र १,१८६ विद्यार्थ्यांची नोंद असल्याचे वृत्तात म्हटले आहे. या आकडेवारीतील तफावत आणि विद्यार्थ्यांच्या नोंदींच्या सत्यतेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. जवळच्या चंपावती इंग्रजी शाळेतील परराज्यांसह २१३ विद्यार्थी मराठी शाळेसाठी जोडल्याचा आरोपही वृत्तात करण्यात आला आहे. त्यामुळे प्रत्यक्षात शाळेत शिक्षण घेणारे विद्यार्थी, हजेरी पटावरील संख्या आणि ऑनलाइन नोंदी यांची सखोल पडताळणी करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.वृत्तानुसार, २१ जून २०२४ रोजी तत्कालीन मुख्याध्यापकांनी प्रत्यक्ष हजेरी पटाच्या आधारे अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांची यादी प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठविली होती. मात्र, संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांनी या प्रकरणाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच २१ जून २०२६ रोजी मुख्याध्यापकांनी

# बीडमध्ये १६ ऑक्टोबरला केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची जाहीर सभा

## दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख, शेतमजूर कुटुंबांना ५० हजार रुपये मदतीची मागणी; पप्पू कागदे यांची माहिती

**लोकनायक वृत्तसेवा** - मराठवाड्यासह बीड जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीत शेतकरी, शेतमजूर आणि मोलमजुरी करणाऱ्या कुटुंबांना आर्थिक मदत मिळावी, यासह विविध मागण्यांसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)च्या वतीने शुक्रवार, १६ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीत जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेत दुष्काळग्रस्तांना मदत, अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरण रद्द करणे आणि गायरान जमिनींचे प्रलंबित प्रश्न निकाली काढण्यासह विविध मागण्या मांडण्यात येणार असल्याची माहिती रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष ताथा युवा चे प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी सोमवारी (दि. १२ ऑक्टोबर) बीड येथे पत्रकार परिषदेत दिली.यावेळी राजु जोगदंड, किसन तांगडे, ज्ञानोबा माने, बापु पवार, अविनाश जोगदंड उपस्थित होते. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी एक लाख रुपये, तर शेतमजूर, कामगार आणि मोलमजुरी करणाऱ्या कुटुंबांना प्रत्येकी ५० हजार रुपये आर्थिक मदत देण्याची मागणी करण्यात येणार आहे. अनुसूचित जातींमधील ५९ जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाची



### दुष्काळग्रस्तांना मदतीचा उपक्रम

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी राज्यातील दुष्काळग्रस्तांसाठी १०० ट्रक धान्य आणि जीवनावश्यक वस्तू देण्याची घोषणा केल्याची माहिती कागदे यांनी दिली. त्याच उपक्रमांतर्गत बीड जिल्ह्यासाठी १ हजार ८०० किराणा साहित्याच्या किट पाठवण्यात आल्या आहेत. ही मदत गरजू कुटुंबांपर्यंत समाजभेद न करता पोहोचविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# चंपावती दांडिया महोत्सवाचे भव्य-दिव्य आयोजन!

## महिला भगिनींसाठी दांडिया स्पर्धेसह आकर्षक पारितोषिकांची मेजवानी!





**लोकनायक वृत्तसेवा** - बीड जिल्ह्यातील सर्वात मोठी सांस्कृतिक चळवळ म्हणून नावारूपास आलेल्या चंपावती महोत्सवाच्या भरघोस यशानंतर आता नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने महिला-भगिनींच्या खास आग्रहास्तव महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने भव्य-दिव्य 'चंपावती दांडिया महोत्सव-२०२६' चे आयोजन करण्यात आले असून दांडियाच्या तालावर बीडकरांना उत्साह, जल्लोष आणि सांस्कृतिक परंपरेचा अनोखा संगम अनुभवायला मिळणार आहे. बीड शहरातील चंपावती इंग्लिश स्कूलच्या मैदानावर शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत हा दांडिया महोत्सव रंगणार आहे. या महोत्सवात महिलांसाठी विशेष दांडिया स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, स्पर्धेतील विजेत्यांसाठी विविध आकर्षक पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. स्पर्धेनंतर ओपन दांडियाच्या माध्यमातून महिला-भगिनींना दांडियाचा मनमुराद आनंद लुटता येणार आहे.नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने महिला-भगिनींना सांस्कृतिक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे आणि बीड शहरात उत्साहपूर्ण वातावरण निर्माण करणे, हा या महोत्सवामागील प्रमुख उद्देश असल्याचे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघांचे प्रदेश अध्यक्ष वसंतराव मुंडे आणि बीड जिल्हा पत्रकार संघांचे अध्यक्ष संतोष मानूरकर यांनी सांगितले. या महोत्सवाची माहिती महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रतिक कांबळे यांनी दिली. तर बीड शहरातील महिला-भगिनींनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन चंपावती दांडिया महोत्सवाची शोभा वाढवावी, असे आवाहन

# पाटेकर कुटुंबियांच्या सांत्वनासाठी आ. धसांची नानाची वाडीला सांत्वन भेट

**लोकनायक वृत्तसेवा** - ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाने मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीची मोठी हानी झाली आहे. आपल्या दमदार अभिनयाने, स्पष्टवक्तेपणाने आणि सामाजिक कार्यातून रसिकांच्या मनात विशेष स्थान निर्माण करणाऱ्या नाना पाटेकर यांना आ. सुरेश धस यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.आ.सुरेश धस यांनी पुणे जिल्ह्यातील डोणजे येथील नानाची वाडी या निवासस्थानी भेट देऊन नाना पाटेकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करत त्यांना



आदरांजली वाहिली. यावेळी त्यांनी नाना पाटेकर यांचे पुत्र मल्हार पाटेकर यांची भेट घेऊन पाटेकर कुटुंबीयांचे सांत्वन केले.नाना पाटेकर यांनी आपल्या अभिनयाच्या माध्यमातून मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत वेगळी ओळख निर्माण केली होती. चित्रपटांमधील विविधांगी भूमिका, परखड विचार आणि सामाजिक कार्याच्या माध्यमातून त्यांनी समाजमनावर आपली छाप

# श्री.उध्दव ठाकरे यांच्या उपस्थितीत परिषदेचा पुरस्कार वितरण सोहळा

## येत्या शनिवारी मुंबईत; सर्वांनी उपस्थित राहावे मुख्य विश्वस्त श्री.एस.एस.देशमुख यांचे आवाहन



**लोकनायक वृत्तसेवा** - अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांचे वितरण शनिवार दिनांक १७ ऑक्टोबर २०२६ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर येथे शिवसेना पक्षप्रमुख श्री.उध्दव ठाकरें यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.. जेष्ठ पत्रकार हेमंत देसाई यांना बाळशास्त्री जांभेकर जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.पत्रकारांची मातृसंस्था असलेल्या अखिल भारतीय मराठी परिषदेच्यावतीने दरवर्षी पत्रकारितेत भरीव योगदान देणाऱ्या पत्रकारांचा विविध पुरस्कार देऊन दरवर्षी सन्मान केला जातो.यावर्षी बाळशास्त्री जांभेकर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार हेमंत देसाई यांना जाहीर झाला आहे. २५ हजार



प्रो.सागर गायकवाड मो.9860145412
सागर ग्लास हाऊस
आमच्याकडे सर्व प्रकारचे विन्डोज,डोअर, अॅल्युमिनियम पार्टीशनची कामे केली जातील तसेच लॅमिनेशन डोअर सनमाइक डोअर फायबर डोअर सागवन डोअर योग्य भावत तयार करुण मिळतील.
पत्ता: श्री संत सावतामाळी चौक कृष्णमंदीर रोड बीड

तुमच्या व्यवसायाला डिजिटल बनवा!
वेबसाईट • अॅप • सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट
वेबसाईट: बिझनेस वेबसाईट, ई-कॉमर्स वेबसाईट, कंपनी / कॉर्पोरेट वेबसाईट, स्कूल / कॉलेज वेबसाईट, बुकिंग / सर्व्हिस वेबसाईट
मोबाईल अॅप: Android App, iOS App, ई-कॉमर्स अॅप, बुकिंग अॅप, डिलिव्हरी अॅप, बिझनेस मॅनेजमेंट अॅप
सॉफ्टवेअर: कस्टम सॉफ्टवेअर, इन्व्हेंटरी मॅनेजमेंट, CRM सॉफ्टवेअर, स्कूल / इन्स्टिट्यूट सॉफ्टवेअर, कर्मचारी मॅनेजमेंट सिस्टीम, कस्टम सॉफ्टवेअर - तुमच्या गरजेनुसार!
★ आधुनिक तंत्रज्ञान • वेबवर डिझाइन • परवडणाऱ्या दरात उत्कृष्ट सेवा ★
आजच संपर्क करा! | 9405941894 / 7796747593
संभाजीनगर, महाराष्ट्र

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड

लोकनायक

मंगळवार दि १३ ऑक्टोबर २०२६



## जाहीर नामा

**वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत श्रीमती पी.व्ही.चव्हाण २ रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, केज, यांच्या न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक ४११/२०२६**

**नि.क. ड**

**विकम इनकर इतर विरुध्द निरंक**

ज्यापेक्षा मयत सोनाजी पि. भाउ इनकर हे दिनांक ०१ माहे ०१ सन २०२५ रोजी मोजे डोका ता. केज. जि. बीड येथे मयत झालेले आहेत आणि अर्जदार यांनी हया कोर्टास सदरहु यांचे मृत्यू नंतर त्यांना शासकीय व निमशासकीय कार्यालयीन कामकाजाचा लाभ मिळणेसाठी वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज विधिज्ञ के. जी. शुक्ला यांचे मार्फत दाखल केला आहे.

अर्जदार – अर्जदार – १. विक्रम पिता सोनाजी इनकर वय ४४ वर्षे धंदा नौकरी रा. डोका ता. केज जि. बीड.

२. सुरेश पिता सोनाजी इनकर वय ३८ वर्षे धंदा मजुरी रा. डोका ता. केज जि. बीड.

३. रमेश पिता सोनाजी इनकर वय ३६ वर्षे धंदा मजुरी रा. डोका ता. केज जि. बीड.

४. कलावती भ्र. सोनाजी इनकर वय ७८ वर्षे धंदा घरकाम रा. डोका ता. केज जि. बीड.

त्यापेक्षा अर्जदाराशिवाय सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी हया कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरुन असे कळिवण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहु मयत सोनाजी पि. भाउ इनकर यांचे वारस प्रनाणपत्र देण्यात देईल.

आज दिनांक ०८ माहे १० सन २०२६.

प्रकरणाची पु.ता. ०६/११/२०२६

**स्वाक्षरीत / –**
**क. लिपिक प्रति,**

**आदेशावरुन स्वाक्षरीत / –**
**स. अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय, क. स्तर, केज**

## जाहीर नामा

**जा.क्र/श्रीनप/कावि/वसूली**
**कार्यालय नगर परिषद बीड**
**दिनांक - //२०**
**ख खत P.R कार्ड**

प्रकरण – मालमत्ता रजिस्टरवर अर्जदाराच्या नावाची नोंद घेण्यासाठी (नाव बदलण्या बाबत/ क्षेत्रफळ दुरुस्ती बाबत.)

अर्जदाराचे नाव:मोमीन मुहुम्द मासियोद्दीन पिता मुहुम्द इब्राहिम

पत्ता/राहणार: बीड

सर्व जनतेस जाहिर आवाहन करण्यात येते की, घर क्र.

सव्हे नं.–९०

तरफ–खोड

प्लाटॅ क्रं–४१

पैकी क्षेत्र – १३९.४०चौ. मी.

वर श्री/पठण अतहर खान फकरु खान बीड

चे नाव मालमत्ता रजिस्टरला नोंद आहे/नाही वरील अर्जदाराने या कार्यालयात नाव बदलण्यास / नांव लावण्यास/क्षेत्रफळ दुरुस्तीस अर्ज केला आहे. या विषयी कोणास आक्षेप असेल, हरकत असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज करणे. मुदती नंतर कायद्याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येईल.

चतु: सिमा

पूर्व –स.न.९२ मधील जमीन

पश्चिम–२० फुटाचा रस्ता

दक्षिण– प्लॉट क्र–४०

उत्तर– प्लॉट क्र–४२

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद बीड**

## जाहीर नामा

**जा.क्र/श्रीनप/कावि/वसूली**
**कार्यालय नगर परिषद बीड**
**दिनांक - //२०**
**ख खत P.R कार्ड**

प्रकरण – मालमत्ता रजिस्टरवर अर्जदाराच्या नावाची नोंद घेण्यासाठी (नाव बदलण्या बाबत/ क्षेत्रफळ दुरुस्ती बाबत.)

अर्जदाराचे नाव:फरीदा बेगम भ्र अब्दुल समद

पत्ता/राहणार: बीड

सर्व जनतेस जाहिर आवाहन करण्यात येते की, घर क्र.

सव्हे नं.–११अ

तरफ–माळी

प्लाटॅ क्रं–

पैकी क्षेत्र – ११७.१०चौ. मी.

वर श्री/सय्यद अर्शद हुसेन सय्यद बीड

चे नाव मालमत्ता रजिस्टरला नोंद आहे/नाही वरील अर्जदाराने या कार्यालयात नाव बदलण्यास / नांव लावण्यास/क्षेत्रफळ दुरुस्तीस अर्ज केला आहे. या विषयी कोणास आक्षेप असेल, हरकत असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज करणे. मुदती नंतर कायद्याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येईल.

चतु: सिमा

पूर्व –शबाना बेगम व फरीदा बेगम यांचा प्लॉट

पश्चिम–रस्ता

दक्षिण– फरीदा बेगम यांचा प्लॉट

उत्तर–पठाण यांचा प्लॉट

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद बीड**

## जाहीर नामा

**जा.क्र/श्रीनप/कावि/वसूली**
**कार्यालय नगर परिषद बीड**
**दिनांक - //२०**
**ख खत P.R कार्ड**

प्रकरण – मालमत्ता रजिस्टरवर अर्जदाराच्या नावाची नोंद घेण्यासाठी (नाव बदलण्या बाबत/ क्षेत्रफळ दुरुस्ती बाबत.)

अर्जदाराचे नाव:सौ.फरीदा बेगम अब्दुल समद

पत्ता/राहणार: बीड

सर्व जनतेस जाहिर आवाहन करण्यात येते की, घर क्र.

सव्हे नं.–१ अ

तरफ–माळी

प्लाटॅ क्रं–५६ व ५७

पैकी क्षेत्र – ४१.८२ चौ. मी.

वर श्री/अहेमंद मुजलबा पि.महमद हुसेन बीड

चे नाव मालमत्ता रजिस्टरला नोंद आहे/नाही वरील अर्जदाराने या कार्यालयात नाव बदलण्यास / नांव लावण्यास/क्षेत्रफळ दुरुस्तीस अर्ज केला आहे. या विषयी कोणास आक्षेप असेल, हरकत असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज करणे. मुदती नंतर कायद्याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येईल.

चतु: सिमा

पूर्व –फरीदा बेगम यांचा प्लॉट

पश्चिम–१५ फुटाचा रस्ता

दक्षिण– सय्यद अर्शद हुसेन यांचा प्लॉट

उत्तर–साय्यद अर्शद हुसेन यांचा प्लॉट

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद बीड**

## जाहीर नामा

**जा.क्र/श्रीनप/कावि/वसूली**
**कार्यालय नगर परिषद बीड**
**दिनांक - //२०**
**ख खत P.R कार्ड**

प्रकरण – मालमत्ता रजिस्टरवर अर्जदाराच्या नावाची नोंद घेण्यासाठी (नाव बदलण्या बाबत/ क्षेत्रफळ दुरुस्ती बाबत.)

अर्जदाराचे नाव:सय्यद राकीयोदिन सय्यद फसीयोदिन

पत्ता/राहणार: बीड

सर्व जनतेस जाहिर आवाहन करण्यात येते की, घर क्र.

सव्हे नं.–९०

तरफ–खोड

प्लाटॅ क्रं–४०

पैकी क्षेत्र –१३९.४० चौ. मी.

वर श्री/पठाण अथहर खान फकरु खान बीड

चे नाव मालमत्ता रजिस्टरला नोंद आहे/नाही वरील अर्जदाराने या कार्यालयात नाव बदलण्यास / नांव लावण्यास/क्षेत्रफळ दुरुस्तीस अर्ज केला आहे. या विषयी कोणास आक्षेप असेल, हरकत असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज करणे. मुदती नंतर कायद्याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येईल.

चतु: सिमा

पूर्व –स.न.९२ मधील जमीन

पश्चिम–२० फुटाचा रस्ता

दक्षिण– प्लॉट क्र–३९

उत्तर– प्लॉट क्र–४१

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद बीड**

## जाहीर नामा

**जा.क्र/श्रीनप/कावि/वसूली**
**कार्यालय नगर परिषद बीड**
**दिनांक - //२०**
**ख खत P.R कार्ड**

प्रकरण – मालमत्ता रजिस्टरवर अर्जदाराच्या नावाची नोंद घेण्यासाठी (नाव बदलण्या बाबत/ क्षेत्रफळ दुरुस्ती बाबत.)

अर्जदाराचे नाव:मोमीन महुम्मद मसीयोद्दीन पि.महुम्मद इब्राहिम

पत्ता/राहणार: बीड

सर्व जनतेस जाहिर आवाहन करण्यात येते की, घर क्र.

सव्हे नं.–९०

तरफ–खोड

प्लाटॅ क्रं–५६ व ५७

पैकी क्षेत्र – २२३.०४ चौ. मी.

वर श्री/शेख सलीम शेख अजीज बीड

चे नाव मालमत्ता रजिस्टरला नोंद आहे/नाही वरील अर्जदाराने या कार्यालयात नाव बदलण्यास / नांव लावण्यास/क्षेत्रफळ दुरुस्तीस अर्ज केला आहे. या विषयी कोणास आक्षेप असेल, हरकत असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज करणे. मुदती नंतर कायद्याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येईल.

चतु: सिमा

पूर्व –२० फुटाचा रस्ता

पश्चिम–प्लॉट क्र– ६२ व ६३

दक्षिण– प्लॉट क्र–५५

उत्तर– ३५ फुटाचा रस्ता

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद बीड**

## जाहीर नामा

**जा.क्र/श्रीनप/कावि/वसूली**
**कार्यालय नगर परिषद बीड**
**दिनांक - //२०**
**ख खत P.R कार्ड**

प्रकरण – मालमत्ता रजिस्टरवर अर्जदाराच्या नावाची नोंद घेण्यासाठी (नाव बदलण्या बाबत/ क्षेत्रफळ दुरुस्ती बाबत.)

अर्जदाराचे नाव:मोमीन महुम्मद मसीयोद्दीन पि.महुम्मद इब्राहिम

पत्ता/राहणार: बीड

सर्व जनतेस जाहिर आवाहन करण्यात येते की, घर क्र.

सव्हे नं.–९०

तरफ–खोड

प्लाटॅ क्रं–५६ व ५७

पैकी क्षेत्र – २२३.०४ चौ. मी.

वर श्री/शेख सलीम शेख अजीज बीड

चे नाव मालमत्ता रजिस्टरला नोंद आहे/नाही वरील अर्जदाराने या कार्यालयात नाव बदलण्यास / नांव लावण्यास/क्षेत्रफळ दुरुस्तीस अर्ज केला आहे. या विषयी कोणास आक्षेप असेल, हरकत असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज करणे. मुदती नंतर कायद्याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येईल.

चतु: सिमा

पूर्व –२० फुटाचा रस्ता

पश्चिम–प्लॉट क्र– ६२ व ६३

दक्षिण– प्लॉट क्र–५५

उत्तर– ३५ फुटाचा रस्ता

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद बीड**

# ऊसाला ४२५०भाव मिळावा म्हणून आंदोलन पेटले ; शेतकऱ्यांची आक्रमक भूमिका

**लोकनायक वृत्तसेवा** – माजलगाव मतदार संघातील साखर कारखान्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना गाळप हंगाम २०२६–२७मध्ये ऊसाचा भाव प्रती टन ४हजार,२५०रू देण्यात आला पाहिजे म्हणून युवा शेतकरी संर्षघ समितीचे वतीने पुकारलेल्या आंदोलनाला ऊस उत्पादक शेतकऱ्यां कडून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असून माजलगाव तालुक्यातील अनेक गावात कारखान्याने घोषीत केलेल्या २५,२०

रुपयांच्या पहिल्या टप्प्यातील रक्कमेचा निषेध व्यक्त करत ऊसाने भरलेल्या वाहनांची टायर पंक्चर केली तर काही ठिकाणी रिकामे टायर जाळून आंदोलन करण्यात आल्याची माहिती समजली आहे.माजलगाव मतदार संघांतील लोकनेते सुंदररावजी सोळंके,छत्रपती



सहकारी साखर कारखाना व एनएसएल शुगर इंडस्ट्रीज लिमिटेड,(जयमहेश) पवारवाडी,या तीनही साखर कारखान्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना गाळप

हंगाम २०२६मध्ये ऊसाचा प्रती टन २९७०रु दर निश्चित करताना १०ऑक्टोबर रोजी युवा शेतकरी संर्षघ समिती सोबत झालेल्या बैठकीत पहिला टप्पा २५,२०दिला जाईल आणि त्यानंतर उर्वरित रक्कम देण्यात येईल असा निर्णय दिला होता.यानंतर ११ऑक्टोबर रोजी नियोजित ऊस परिषदेत संघर्ष समिती च्या वतीने ४हजार,२५० रुपये देण्यात आले तरच गाळप हंगाम सुरू करा नसता शेतकऱ्यांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला होता त्यानुसार ११ऑक्टोबर रोजी च्या रात्रीच शेतकऱ्यांनी गाळपासाठी ऊस घेऊन जाणाऱ्या ट्रॅक्टर्सची टायर पंक्चर केली होती.यानंतर १२ऑक्टोबर रोजी च्या सकाळी १०वा च्या सुमारास माजलगाव तालुक्यातील लोणगाव येथे ट्रॅक्टर अडवून रिकामे टायर जाळून आंदोलन सुरू करण्यात आले.

यानंतर नागडगाव,सुर्डीनजीक,छत्रबोरगा, लवुळनं१, डाके पिंपरी आदी गावातील रस्त्यावर टायर जाळून कारखान्याने घोषीत केलेल्या ऊस दराचा निषेध करण्यात आला आहे.

# आमदार, खासदार हो !,आटपाडीतल्या अतिक्रमण विरोधात आवाज उठवा !!

**लोकनायक वृत्तसेवा** – अधिकारी, पदाधिकारी यांच्या अप्रत्यक्षातील मेहरबानीने वाढीस लागलेले अब्जो रुपये किंमतीच्या शासकीय जागेवरील अतिक्रमण हटविणेसाठी राज्यातील आणि विशेषत : सांगली जिल्ह्यातील आमदार, खासदार यांनी जोरदार आवाज उठवावा . असे आवाहन आटपाडीचे सामाजिक कार्यकर्ते सादिक खाटीक यांनी लोकप्रतिनिधींना उद्देशुन केले आहे .आटपाडीच्या बाजार तळाच्या ओढापात्र ते धांडोर ओढा पात्रा पर्यंतच्या आटपाडी – दिघंची रस्त्याच्या दुतर्फा असणाऱ्या अनेक ठिकाणच्या शासकीय जागांवर आणि देवस्थान इनाम वर्ग – ३ च्या जागेवर झालेल्या अतिक्रमणाने आटपाडीतील अतिक्रमणाचा कळस गाठला गेला आहे . शासकीय जागांचा आणि देवस्थान इनाम वर्ग – ३ च्या जागेचे रेकॉर्ड शासनाच्या अधिकाऱ्यांकडे उपलब्ध असताना जबाबदार अधिकारी मुग गिळून गप्प का आहेत . हा प्रश्न आहे . बांधकामाची परवानगी न घेता शासकीय जागांवर अनेकांनी अनेक मजली बांधकाम बिनधास्तपणे करीत शासनाच्या तोंडावर सणसणीत चपराक मारली आहे . सुमारे ३ एकर इतक्या देवस्थान इनाम वर्ग ३ च्या जागे वरील प्रचंड अतिक्रमणाला शासकीय अधिकाऱ्यांची साथ सोबत लाभल्यानेच हे अघटीत घडल्याचे श्री . विठ्ठलांचे भक्त खाजगीत बोलत असतात .आटपाडी – दिघंची रोड लगतच्या दोन्ही कबरस्थान ते धांडोर ओढ्या पर्यतच्या काही सर्व्हे नंबर च्या नकाशात जवळ जवळ ७० टक्के क्षेत्र शासकीय मालकीचे असल्याचे आज ही दाखवते . मग या विरोधात अधिकारी का कारवाई करीत नाहीत . अतिक्रमण धारकांकडून या अधिकाऱ्यांचे खिसे गरम केले जातात का ? याची गांभीर्याने आणि अतितातडीने चौकशी होणे गरजेचे आहे .आटपाडी तलावापासून आटपाडी शहराकडे झेपावणाऱ्या दोन्ही ओढ्यातील अतिक्रमणे तातडीने काढणे अत्यंत महत्वाचे आहे . ३ महिन्यात मोजणी करून ओढ्याच्या दुतर्फाच्या हद्दी निश्चित करणेचा प्रयत्न कितपत यशस्वी होतो . हे देवच जाणे . अतितातडीच्या मोजणीसाठी पैसे भरून अनेक ठिकाणच्या मोजणीसाठी वर्ष



वर्ष विलंब करणाऱ्यांकडून पारदर्शक आणि तातडीने मोजणी होण्यासाठी सर्वोत्तम ठरणाऱ्या निमताना मोजणीचाच मोजणी प्रकार ओढा पात्रातील मोजणीसाठी वापरला गेला पाहिजे . आटपाडीचे एस . टी . स्टॅन्ड ते आटपाडी बाजार पटांगण दरम्यानच्या मुळ आटपाडी गावच्या संरक्षणासाठीच्या संरक्षक तटबंदीच्या अंदाजे ७ रुंदीच्या आणि सुमारे दीड किमी अंतराच्या भिंतीला ओलांडून १० ते २५ फुट बाहेर येत अनेकांनी आपली प्रचंड बांधकामे केली आहेत . हे गावठाण नकाशाच्या सीट वरून दिसून येते . पण हे बघतो कोण ? आटपाडी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी असोत किंवा तालुक्याचे तहसीलदार असोत किंवा विभागाचे प्रांताधिकारी असोत . यापैकी कोणी या अतिक्रमणां बाबतीत गांभीर्याने दखल घेतील असे आज अखेरच्या त्यांच्या पावित्र्यावरून वाटत नाही . आटपाडीच्या ओढ्याला अनेक वेळा महापूर आला आलेला आहे . महापुराच्या पाण्याने ग्रामपंचायतीच्या आणि आताच्या नगरपंचायत इमारतीच्या पाठीमागील काळा मारुतीच्या पायऱ्या बुडल्या होत्या .

तर दुसऱ्या टोकाच्या पाण्यात ओढ्याकाठाची दोन्ही कबरस्थाने पाण्याखाली गेली होती . ही पुर रेषेची वस्तुस्थिती असताना पाव ओढा पात्रात संरक्षक भिंत उभारण्यासाठी कोणत्या अधिकाऱ्यांने या भिंतीच्या मागे पुर रेषा असल्याचा अभिप्राय दिला असेल तर त्याची गांभीर्याने चौकशी करून खोटा अहवाल देणारावर कडक कारवाई होणे अभिप्रेत आहे . मरिमाता मंदिर ते उत्तरेश्वर मंदिरच्या बाजार तळावरील पुर रेषेत येणाऱ्या शासकीय जागेवरील अनेक इमारती गाळ्यांची रितसर शासकीय परवानगीनेच उभारणी झाली आहे का ? किंवा अनाधिकाराने अतिक्रमण करीत बाजारतळ व्यापला गेला आहे का हे ही राज्याच्या उच्च पदस्थ अधिकारी महोदयांच्या माध्यमातील

पथकाकडून चिकित्सा होणे अत्यंत गरजेचे आहे .राज्यातील आमदार, खासदार महोदयांनी आणि विशेषतः सांगली जिल्ह्यातील आमदार, खासदार महोदयांनी विधिमंडळ आणि संसदेच्या दोन्ही सभागृहात जोरदार आवाज उठविल्यास आणि या अतिक्रमण वाढीत प्रत्यक्ष अप्रत्यक्ष जबाबदार असणाऱ्या अधिकारी – पदाधिकाऱ्यांच्या बडतर्फीसाठी आग्रह धरल्यासच सुस्तावलेली शासन व्यवस्था जागी होईल . ओढा पात्रातले अतिक्रमण, अतिक्रमण ठरू नये म्हणून काही मान्यवर ओढा पात्राच्या जागेचा ७ / १२ बनविण्यासाठी शासनाकडे आग्रही असल्याची चर्चा धनदांडग्या, रानदांडग्या, जातदांडग्या अतिक्रमण धारकांत सुरू आहे . असा होऊ पाहणारा प्रकार रोखला जावा . आणि अतिक्रमण वाढीस लावणाऱ्यांच्या विरोधात त्यांच्या प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पुराव्याच्या आधारे कठोर कारवाई झाली पाहिजे . असेही सादिक खाटीक यांनी शेवटी म्हंटले आहे

## पान ४ वरून

**तळागाळातील विद्यार्थ्यांना...**

देशाच्या शैक्षणिक भविष्याला नवी दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांनीही अद्ययावत राहणे गरजेचेविद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणे पुरेसे नाही. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण ओळखून त्यांना विविध क्षेत्रांत स्वतःला सिद्ध करण्याची संधी दिली पाहिजे. महाविद्यालयातील शिक्षक आणि प्राध्यापक चांगले काम करीत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. मात्र, बदलत्या काळानुसार शिक्षकांनी सातत्याने अद्ययावत राहून विद्यार्थ्यांना आधुनिक ज्ञान आणि कौशल्यांचे मार्गदर्शन केले, तर याच महाविद्यालयातील विद्यार्थी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेच्या जोरावर महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवावा, यासाठी सर्वांनी कसोशीने प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले.याप्रसंगी सांस्कृतिक विभाग तसेच ‘आविष्कार’ संशोधन उपक्रमांतर्गत विविध स्तरांवर प्रावीण्य मिळिवलेल्या विद्यार्थ्यांचा जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.कै. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर यांच्या स्मृतिदालनाच्या उद्घाटनामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक वाटचालीतील एका महत्त्वपूर्ण पर्वाची नोंद झाली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी आणि शिक्षणासोबतच सामाजिक जाणीव, संशोधनवृत्ती व गुणवत्तेची कास धरण्याची प्रेरणा मिळावी, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आल

**मतदार यादी पुनरिक्षणासाठी** ...व घनसावंगी विधानसभा मतदारसंघांसाठी भाजपाचे जिल्हाध्यक्ष (ग्रामीण) आमदार नारायणराव कुचे, तर भोकरदन विधानसभा मतदारसंघासाठी आमदार संतोष दानवे पाटील यांची पालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्तीपत्रात संबंधित पालकांनी आपल्या विधानसभा मतदारसंघात योग्य नियोजन करून मतदार याद्यांच्या विशेष सघन पुनरिक्षण (डखठ) मोहिमेला गती देण्यासाठी प्रभावीपणे प्रयत्न करावेत, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

**रावेरमध्ये श्री महाराजा...**

आयोजनासाठी हे ठिकाण उपयुक्त ठरणार आहे.या कार्यक्रमाला अखिल भारतीय अग्रवाल संमेलनाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष जितेंद्र

## पान १ वरून

**चंपावती शाळेतील...**

केलेल्या पत्रव्यवहारानंतरही शिक्षण विभागाकडून कारवाई झाली नसल्याचे वृत्तात नमूद आहे. हजेरी पटाच्या पडताळणीचा अहवाल उपशिक्षणाधिकारी (योजना विभाग) प्रमोद सोनटक्के आणि तत्कालीन मुख्याध्यापक यांच्या संदर्भात नमूद करण्यात आला आहे.या प्रकरणात ऑनलाइन विद्यार्थी नोंदी कोणत्या कागदपत्रांच्या आधारे करण्यात आल्या, संबंधित विद्यार्थ्यांचे प्रवेश अधिकृत होते का, संच मान्यता देताना प्रत्यक्ष पटसंख्येची तपासणी झाली होती का आणि अतिरिक्त शिक्षकांच्या पदांबाबत कोणते निर्णय घेण्यात आले, याची चौकशी होणे आवश्यक आहे. शिक्षण विभागाने संबंधित नोंदी, हजेरी पट आणि संच मान्यतेची कागदपत्रे तपासून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी या प्रकरणाच्या अनुषंगाने होत आहे.विद्यार्थ्यांच्या संख्येतील तफावत आणि शिक्षक पदांच्या मंजुरीसंदर्भातील आरोप गंभीर असल्याने वरिष्ठ शिक्षण अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. आता शिक्षण विभाग या प्रकरणाची दखल घेऊन संबंधित नोंदींची पडताळणी करणार का आणि कथित अनियमिततेबाबत काय कारवाई करणार, याकडे बीडमधील शैक्षणिक क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

**बीडमध्ये १६ ऑक्टोबरला...**

प्रक्रिया रद्द करावी, २०११ पर्यंत कसत असलेल्या गायरान जमिनींची प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढावीत आणि महागाई निर्देशांकानुसार विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करावी, अशा मागण्याही सभेत मांडण्यात येणार आहेत.

**पाटेकर कुटुंबियांच्या...**

उमटवली. विशेषतः सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी केलेले कार्य सदैव स्मरणात राहील.नाना पाटेकर यांच्या निधनामुळे कलाविश्वासह सामाजिक क्षेत्राचीही

मोठी हानी झाली असून, त्यांच्या कलात्मक आणि सामाजिक योगदानाच्या आठवणी कायम जिवंत राहतील. या दुःखद प्रसंगी आ. सुरेश धस यांनी पाटेकर कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होत त्यांना धीर दिला....

**श्री.उध्दव ठाकरे ...**

रूपये रोख, मानपत्र, स्मृतीचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे. त्याच बरोबर यावर्षीचे आचार्य अत्रे स्मृती पुरस्कार– ज्येष्ठ पत्रकार प्रशांत कदम,सावित्रीबाई फुले पत्रकारिता पुरस्कार – जान्हवी मुळे,हिंदी पत्रकारितेचे भीष्माचार्य बाबुराव पराडकर पुरस्कार – अनुराग त्रिपाठी,विशेष मान्यवरांच्या रकमेतील पुरस्कार दत्ताजीराव तटकरे स्मृती पत्रकारिता सचिन परब (इटीव्हीचे मुंबई ब्यूरो चीफ),

स्वातंत्र्यसेनानी मनोहरपंत चिवटे आरोग्य पत्रकारिता पुरस्कार – संतोष आंधळे,माणिकराव देशमुखे देवडीकर कृषी पत्रकारिता –सुनील पाटील (कोल्हापूर सकाळ),भगवंतराव इंगळे स्मृती पत्रकारिता अविनाश महालक्ष्से (नागपूर),नागोजीराव उर्फ आण्णासाहेब दुधगावकर स्मृती – अभय देशपांडे, प्रमोद भागवत स्मृती शोध पत्रकारिता –महेश तिवारी (न्यूज १८ लोकमत, गडचिरोली),संतोष पवार स्मृती पत्रकारिता – बापूसाहेब जाधव (सातारा, ग्रामोद्धार) यांना जाहीर करण्यात आला आहे. सदरचा कार्यक्रम हा शनिवार दिनांक १७ ऑक्टोबर २०२६, सायं. ६.०० वाजता यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई या ठिकाणी होत आहे. दिनांक १७ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता होणाऱ्या या पुरस्कार वितरण सोहळ्यास सर्वांनी मोठया संख्येने उपस्थित राहावं असे आवाहन अखिल भारतीय

मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख, अध्यक्ष शिवराज काटकर, विशस्त शरद पावळे, किरण नाईक, मुंबई शाखेचे अध्यक्ष राजा आचाटे, मुंबई अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष दीपक कैतके, डिजिटल मिडिया परिषदेचे अनिल वाघमारे, माजी अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, सुरेश नाईकवाडे, मन्सुरभाई शेख, शोभा जयपुरकर आर्दिनी केले आहे.

**चंपावती दांडिया महोत्सवाचे ...**

महोत्सवाचे संयोजक सोमेश्वर कदम यांनी केले आहे. बीडमध्ये दांडियाचा जल्लोष, संस्कृतीचा उत्सव आणि महिला–भगिनींच्या उत्साहाचा रंगतदार सोहळा अनुभवण्यासाठी चंपावती दांडिया महोत्सव सज्ज झाला आहे.

loknayak 13.10.2026 :Copy of Layout 1 10/12/2026 11:14 PM Page 3



# औष्णिक वीज केंद्रांच्या आधुनिकीकरणासह सुरक्षेवर मंथन; विलास मोटघरे यांचे राष्ट्रीय परिषदेत मार्गदर्शन

## वीज निर्मितीतील कार्यक्षमता, इंधन बचत आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या वा-परावर भर; महानिर्मितीच्या अनुभवाला राष्ट्रीय स्तरावर महत्त्व

**लोकनायक वृत्तसेवा –**
महाराष्ट्रातील औष्णिक वीज निर्मिती केंद्रांचे आधुनिकीकरण, सुरक्षित संचालन आणि ऊर्जा कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने महानिर्मितीच्या अनुभवी अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन महत्त्व-पूर्ण ठरत आहे. महानिर्मितीचे नवनियुक्त प्रभारी कार्यकारी संचालक विलास मोटघरे यांनी मुंबई येथे आयोजित राष्ट्रीय स्तरावरील औद्योगिक परिषदेत सहभागी होत औष्णिक वीज निर्मिती क्षेत्रातील तांत्रिक आव्हाने, सुरक्षा व्यवस्था आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापराबाबत आपले विचार मांडले.१० ऑक्टोबर रोजी आयोजित या परिषदेत महाराष्ट्र राज्याच्या बाष्पक संचा-लनालयाच्या (ऊळीशलीीरींश ष डींशरा इेळश्रशीी) मार्गदर्शनाखाली तसेच औद्योगिक क्षेत्रातील सहकार्याने औष्णिक वीज उद्योगाशी संबंधित विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. वीज निर्मिती केंद्रांचे सुरक्षित संचालन, तांत्रिक सुधारणा आणि बदलत्या औद्योगिक गरजांनुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब या विषयांना परिषदेत विशेष प्राधान्य देण्यात आले.आधुनिकीकरणातून कार्यक्षम व सुरक्षित वीज निर्मितीचा ध्यास



दीर्घ अनुभवाच्या बळावर विलास मोटघरे यांनी औष्णिक वीज निर्मिती क्षेत्रासमोरील विविध आव्हाने आणि त्यावरील संभाव्य उपाययोजनांवर मार्गदर्शन केले. वीज केंद्रांची कार्यक्षमता वाढविणे, उत्पादन खर्च नियंत्रित ठेवणे, इंधनाची बचत करणे आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पर्यावरणपूरक वीज निर्मितीला चालना देणे, या महत्त्वपूर्ण बाबींवर त्यांनी भर दिला.

वीज निर्मिती प्रक्रियेत सुरक्षा मानकांचे काटेकोर पालन, यंत्रसामग्रीची कार्यक्षमता टिकविणे, तांत्रिक अडचणींवर प्रभावी उपाययोजना करणे आणि उत्पादन क्षमतेत वाढ करण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे या चर्चेतून अधोरेखित झाले.

कोराडी ते पारसपर्यंतच्या अनुभवाचा ठसा विलास मोटघरे यांना कोराडी, खापरखेडा, चंद्रपूर आणि पारस यांसारख्या महाराष्ट्रातील प्रमुख औष्णिक वीज निर्मिती केंद्रांच्या संचालन व व्यवस्थापनाशी संबंधित व्यापक अनुभव आहे. या अनुभवाच्या आधारे औष्णिक वीज केंद्रांमधील प्रत्यक्ष कामकाज, तांत्रिक सुधारणा, सुरक्षितता आणि व्यवस्थापनातील समन्वय या विषयांवर त्यांनी मांडलेले विचार परिषदेसाठी महत्त्वपूर्ण ठरले.

औष्णिक वीज केंद्रांमध्ये सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देतानाच उत्पादनाची गुणवत्ता आणि कार्यक्षमता कायम राखणे गरजेचे आहे. त्यासाठी महानिर्मिती आणि बाष्पक संचालनालय यांच्यात प्रभावी समन्वय, तांत्रिक मार्गदर्शन आणि सुरक्षा उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी आवश्यक असल्याचेही या परिषदेत अधोरेखित करण्यात आले.सुरक्षा, तंत्रज्ञान आणि ऊर्जा कार्यक्षमतेवर भर

औद्योगिक क्षेत्रात सातत्याने बदलणाऱ्या तांत्रिक गरजा लक्षात घेता औष्णिक वीज निर्मिती केंद्रांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार, सुरक्षा व्यवस्थेचे बळकटीकरण आणि उपलब्ध संसाधनांचा कार्यक्षम वापर यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. या अनुषंगाने परिषदेत विविध तज्ज्ञांनी आपले अनुभव आणि विचार मांडत औष्णिक वीज निर्मिती क्षेत्राच्या भविष्यातील वाटचालीवर चर्चा केली.

विलास मोटघरे यांच्या सहभागामुळे महानिर्मितीच्या अनुभवाधारित कार्यपद्धतीला राष्ट्रीय स्तरावरील औद्योगिक चर्चेत स्थान मिळाले. त्यांच्या मार्गदर्शनातून वीज निर्मिती क्षेत्रातील अधिकारी आणि अभियंत्यांना आधुनिक तंत्रज्ञान, सुरक्षित संचालन आणि कार्यक्षम व्यवस्थापनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण दिशा मिळण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# महायुतीचे सतीश चव्हाण मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात मोठा जनसंपर्क असलेले उमेदवार – आ. प्रतापराव पाटील चिखलीकर

**लोकनायक वृत्तसेवा –**

मराठवाडयातील आठही जिल्ह्यात आणि तालुक्यात मोठा जनसंपर्क असलेले महायुतीचे उमेदवार आ. सतीश चव्हाण असून त्यांनी आपल्या तीनही टर्म मध्ये अनेक प्रश्न सोडविले. पदवीधरांची अनेक प्रश्न मार्गी लावणारे राष्ट्रवादी काँग्रेस - महायुतीचे उमेदवार सतीश चव्हाण यांना पहिल्या पसंतीचे मतदान देऊन प्रचंड मतांनी विजयी करावे असे आहवान आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले. शहरातील जिजामाता मंगल कार्यालयातील आयोजित मराठवाडा पदवीधर मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस व महायुतीचे उमेदवार सतीश चव्हाण यांच्या प्रचारार्थ आ. प्रता-पराव पाटील चिखलीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रचार सभा दि. १० रोजी शनिवारी पार पडली.

त्याप्रसंगी आ. चिखलीकर बोलत होते. यावेळी मराठवाडा विभाग शिक्षक आ. विक्रम काळे, माजी आ. मोहनअण्णा हंबर्डे, माजी आ. अविनाश घाटे, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील

होटाळकर, लोह्याचे नगराध्यक्ष शरद पवार, ॲड. मुक्तेश्वर धोंडगे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, उपनगराध्यक्ष करीम शेख, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, प्रा. जांभरूनकार, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, माजी काँग्रेस शहराध्यक्ष वसंतराव पवार, माजी उपनगराध्यक्ष दता वाले, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष छत्रपती स्वामी, कंधार तालुकाध्यक्ष मनोहर पाटील भोसीकर, नगरसेवक हरिभाऊ चव्हाण, प्रा. डॉ. धनंजय पवार, सेवानिवृत्त मुख्याध्यापक कृ. भा. जाधव आदींची उप-स्थिती होती. पुढे बोल-ताना आ. प्रतापराव पाटील चिखलीकर म्हणाले, संपूर्ण मराठवाडा विभाग म्हणजे आठ जिल्हे असलेला हा पदवीधर मतदारसंघ आहे. त्या सर्व तालुक्यात पदवीधर मतदारसंघाचे व महायुतीचे उमेदवार सतीश चव्हाण यांचा जनसंपर्क आहे. त्यांची यंत्रणा सगळीकडे आहे.

आणि जवळपास सर्वच भागात त्यांनी भरघोस निधी दिली आहे. विधानपरिषदेत अनेक प्रश्न त्यांनी मांडलेले आहेत. पदवीधरांच्या प्रश्नांची जाणीव असलेले कार्यतत्पर एकमेव उमेदवार आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस व महायुतीचे उमेदवार सतीश चव्हाण यांना पहिल्या पसंतीचे मत देऊन विजयी करावे. असेही चिखलीकर म्हणाले. शिक्षक आ. विक्रम काळे यांनी मराठवाड्यात विविध प्रश्न मार्गी लावताना पदवीधर, शिक्षक डॉक्टर, वकील व तरुणांचे प्रश्न मांडले आहेत. आ. प्रतापराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली आपण या भागात मोठ्या संख्येने

सतीश चव्हाण यांना मतदान करावे असे

आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विक्रम कदम यांनी तर आभार गटनेते भास्कर पवार यांनी मानले.

# सुनेगाव तलावात वृद्धाचा मृतदेह आढळला ; आर्थिक विवंचनेतून आत्महत्या असल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज

**लोकनायक वृत्तसेवा –**
तालुक्यातील सु-नेगाव तलावातील पाण्यावर एका इसमाचे प्रेत पाण्यावर तरंगताना काहींच्या नजरेत येताच त्यांनी सदरील घटना पोलिसांना कळिवली असता पोलिसांनी घटनास्थळावर जाऊन प्रेत पाण्याबाहेर काढून माहिती घेतली असता सदरील व्यक्ती हा देऊळगाव येथील पासष्ट वर्षीय वृद्ध इसम असून त्याने आर्थिक विवंचनेतून आत्महत्या केली असावी असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला. सदरील घटना दि. ११ रोजी दुपारी उघडकीस आली. लोहा शहराला पाणी पुरवठा करणारा सुनेगाव तलावात एका अन-ोळखी व्यक्तीचा मृतदेह पाण्यावर तरंगताना जनावरे चारणाऱ्यांच्या लक्षात आले. सदरील घटना



वाऱ्यासारखी शहरात पसरताच घटनास्थळी असंख्य नागरिक गोळा झाले होते. पोलिसांनी सदरील प्रेत पाण्याबाहेर काढून माहिती घेतली असता सदरील व्यक्ती हा देऊळगाव येथील लक्ष्मण मरीबा सोनकांबळे (वय ६५) असल्याचे आढळून आले. जीवरक्षक दलाच्या मदतीने तलावातून मृतदेह बाहेर काढण्यात येऊन त्याच्यावर लोहा उपजिल्हा रुग्णालयात शव विचेदन करण्यात आले. मयत लक्ष्मण सोनकांबळे हे दि. ९ पासून घरातून बेपत्ता होते असे सांगण्यात आले. त्यांनी आर्थिक विवंचनेतून आत्महत्या केली असावी असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला.

मयताचा मुलगा चंद्रकांत लक्ष्मण सोनकांबळे यांनी वडिलांची ओळख पटवली. सदर घटनेप्रकरणी चंद्रकांत सोनकांबळे यांच्या माहितीवरून लोहा पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास पोहेकॉ. प्रभाकर क्षीरसागर करत आहेत.

# टेंभुर्णीच्या शिरपेचात पुन्हा एक मानाचा तुरा

## टेंभुर्णीचे भूमिपुत्र डॉ गणेश चंदनशिवे यांची निवड

**लोकनायक वृत्तसेवा –**
टेंभुर्णीचे भूमिपुत्र असलेले लोककला अकादमी विभाग प्रमुख डॉ गणेश चंदनशिवे यांची निवड झाल्या बद्दल टेंभुर्णी च्या शिरपेचात एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.या बद्दल त्यांचे टेंभुर्णी सह परिसरातून अभिनंदन होत आहे.तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्कार निवड समितीत संशोधक डॉ. गणेश चंदनशिवे यांच्यासह सहा मान्यवरांची अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती नुकतीच झाली आहे.महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाने 'तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्कार' निवड समितीची पुनर्रचना केली असून, या समितीवर लोककला अकादमी विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ, प्रख्यात लोककला संशोधक तथा सिने-पार्श्वगायक आदरणीय डॉ. गणेश चंदनशिवे यांची अशासकीय सदस्य म्हणून



नियुक्ती करण्यात आली आहे.यासंदर्भातील शासन निर्णय ८ ऑक्टोबर २०२६ रोजी निर्गमित करण्यात आला.या नव्याने पुनर्गठित करण्यात आलेल्या समितीमध्ये अशासकीय सदस्य म्हणून श्री.रघुवीर खेडेकर, श्रीमती मंगला बनसोडे, डॉ. संतोष खेडलेकर, श्री.अतांबर शिरढोणकर, डॉ. गणेश चंदनशिवे आणि डॉ. श्यामल गरुड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच समितीचे अध्यक्ष म्हणून मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य), सदस्य म्हणून सचिव (पर्यटन व सांस्कृतिक कार्य) आणि संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय हे सदस्य सचिव म्हणून कार्य पाहणार आहेत.लोककला, लोकपरंपरा, संशोधन, अध्यापन आणि सांस्कृतिक संवर्धन या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा या समितीत समावेश झाल्याने तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्कार निवड प्रक्रियेला अधिक व्यापक दृष्टी, पारदर्शकता आणि सांस्कृतिक समृद्धी लाभेल,अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.विशेषतः डॉ.गणेश चंदनशिवे यांनी लोककला संशोधन, विद्यापीठीय अध्यापन, लोकसंगीत आणि सांस्कृतिक जतनाच्या क्षेत्रात केलेल्या बहुमोल कार्याची शासनाने घेतलेली ही दखल त्यांच्या प्रदीर्घ योगदानाचा सन्मान मानली जात आहे.डॉ.गणेश चंदनशिवे यांचे तसेच समितीवर नियुक्त झालेल्या सर्व सन्माननीय सदस्यांचे मनःपूर्वक हार्दिक

# लोककलाकार वैशाली समसापूरकर यांना 'श्रीलक्ष्मीमाता जीवन गौरव पुरस्कार' प्रदान

## उद्योग आणि मराठी भाषा मंत्री उदय सामंत, आबा बागुल आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते पुणे नवरात्री महोत्सवात भव्य सन्मान

**लोकनायक वृत्तसेवा –**
महाराष्ट्राच्या समृद्ध लोककलेचा वारसा जपणाऱ्या व अकलूज लावणी महोत्सव विजेत्या प्रसिद्ध लोककलाकार 'वैशाली समसापूरकर' (जय अंबिका सांस्कृतिक लोकनाट्य कला केंद्र सणसवाडी) यांना यंदाचा अत्यंत प्रतिष्ठित 'श्रीलक्ष्मीमाता जीवन गौरव पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. पुणे नवरात्री महोत्सवाच्या ३२ व्या वर्षाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या भव्य दिमाखदार सोहळ्यात त्यांनी हा मानाचा पुरस्कार अत्यंत आदराने व नम्रतेने स्वीकारला. हा पुरस्कार वितरण सोहळा रविवार, ११ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ५:३० वाजता स्वारगेट येथील श्री.गणेश कला क्रीडा रंगमंच येथे मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडला. महोत्सवाचे अध्यक्ष आणि पुणे पालिकेचे उपमहापौर




आबा बागुल यांनी वैशाली समसापूरकर यांचे पुरस्कार स्वीकारल्याबद्दल मनःपूर्वक आभार मानले व त्यांच्या कलाप्रवासाचा गौरव केला. महाराष्ट्राचे उद्योग व मराठी भाषा मंत्री तथा रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. श्री. उदयजी सामंत यांच्या शुभहस्ते आणि प्रमुख उप-स्थितीत हा सन्मान सोहळा संपन्न झाला. या सोहळ्याला राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक दिग्गजांची विशेष उपस्थिती लाभली होती. याप्रसंगी माजी आमदार उल्हास दादा पवार, विधान परिषदेच्या माजी उपसभापती नीलम ताई गोरे, शिवसेना पुणे महानगर प्रमुख रवींद्र धंगेकर, शिवसेना पुणे शहर प्रमुख प्रमोद नाना भानगिरे, काँग्रेस पश्चिम शहराध्यक्ष दीप्ती ताई चौधरी,माजी राज्यमंत्री बाळासाहेब शिवरकर, तसेच चंद्रकांत कुडाळ, जयंत किराड, सुधीर वाघोलीकर आणि रणजीत पायगुडे यांसारख्या विविध पक्षांतील व क्षेत्रांतील प्रमुख मान्यवरांनी उपस्थित राहून वैशाली समसापूरकर यांचे अभिनंदन केले. पुरस्कार स्वीकारल्यानंतर कलाक्षेत्रातून आणि राज्यभरातील लोककला प्रेमींकडून वैशाली समसापूरकर यांच्यावर शुभेच्छा आणि अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# प्रा. डॉ. ए. बी. फलके यांना राज्यशास्त्र विषयात पीएच.डी. प्राप्त

**लोकनायक वृत्तसेवा –**
दि पिपल्स एज्युकेशन सोसायटी संचलित जामखेड महाविद्यालय, जामखेड येथील प्रा. डॉ. ए. बी. फलके यांना राज्यशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी प्राप्त झाली आहे. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणावादी चळवळीचा ऐतिहासिक अभ्यास (१९५७ ते २०१७)' या विषयावर त्यांनी संशोधन केले.या शैक्षणिक यशाबद्दल संस्थेचे



अध्यक्ष मा. श्री. उद्धवबापू देशमुख यांच्या उपस्थितीत प्रा. डॉ. फलके यांचा सत्कार करण्यात आला संस्थेचे उपाध्यक्ष मा.श्री. दिलीपशेठ गुगळे, सचिव मा.श्री.अरुणकाका चिंतामणी, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष मा. श्री. शशिकांत देशमुख, माजी खजिनदार मा.श्री.राजेश मोरे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. डी. केळकर यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.प्रा. डॉ. फलके यांच्या संशोधनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणावादी चळवळींच्या ऐतिहासिक वाटचालीचा अभ्यास अधोरेखित झाला आहे. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे सर्व संचालक, प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनीही त्यांचे अभिनंदन केले. प्रा. डॉ. फलके यांच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक क्षेत्रातील लौकिकात भर पडली आहे.

# भोकरदनमध्ये वाढदिवसानिमित्त अनोखा उपक्रम; वायफळ खर्चाला फाटा देत चिमुकल्याच्या वाढदिवशी शाळेत केले शालेय साहित्याचे वाटप

**लोकनायक वृत्तसेवा –**
भोकरदन शहरातील फुले नगर परिसरात एका कौतुकास्पद उपक्रमाने साऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. वाढदिवसावर होणारा अनावश्यक खर्च टाळून तोच पैसा समाजोपयोगी कामासाठी खर्च करावा, या उदात्त हेतूने फुले नगरमध्ये वास्तव्यास असलेल्या आकाश जैवळ यांनी आपल्या मुलाच्या ५ व्या वाढदिवसानिमित्त आगळावेगळा पायंडा पाडला आहे.आकाश जैवळ यांनी मुलाच्या वाढदिवसानिमित्त कोणतीही उधळपट्टी न करता, त्यांचा मुलगा ज्या जिजाऊ नगर येथील 'बाल वृंदावन विद्यामंदिर' या शाळेत शिकतो, त्याच शाळेतील लहान मुलांना शालेय साहित्याचे वाटप केले. वाढदिवस असणाऱ्या मुलाचे नाव अक्षांत आकाश




जैवळ असे आहे. या आगळ्यावेगळ्या आणि स्तुत्य उपक्रमामुळे विद्यार्थ्यांसह शिक्षकवृंदाकडून आकाश जैवळ यांच्या या सामाजिक जाणी-वेच्या कार्याचे जोरदार कौतुक होत आहे.

लोकनायक
मंगळवार दि १३ ऑक्टोबर २०२६
४

# तळागाळातील विद्यार्थ्यांना घडवा; गुणवत्तेच्या बळावर जागतिक स्तरावर चमकण्याची संधी निर्माण करा!- जयदत्त क्षीरसागर

## कालिकादेवी महाविद्यालयात कै. केशरबाई क्षीरसागर स्मृतिदालनाचे उद्घाटन

**लोकनायक वृत्तसेवा –** शिक्षणाच्या माध्यमातून तळागाळातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे. आजच्या स्पर्धात्मक युगात गुणवत्तेला जागतिक स्तरावर अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देऊन चालणार नाही, तर संशोधन, सांस्कृतिक क्षेत्र आणि क्रीडा क्षेत्रातही त्यांना प्रावीण्य मिळिवण्यासाठी सक्षम करणे आवश्यक आहे,ङ्ग असे प्रतिपादन जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

शिरूर कासार येथील कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात माजी खासदार कै. केशरबाई सोन-ाजीराव क्षीरसागर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उभारण्यात आलेल्या स्मृतिदालनाचे उद्घाटन जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी माजी सभापती सुधाकर मिसाळ, माजी सभापती सतीश काटे, माजी सभापती बाबुराव केदार, माजी जिल्हा परिषद सदस्य सुभाष क्षीरसागर , शरद ढाकणे,पाडळी चे सरपंच गहिनीनाथ पाखरे, सुलेमान पठाण, गोविंद पाटील गाडेकर, मानूर चे सरपंच पठाण,आजिनाथ गवळी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विश्वास कंधारे, प्राचार्य केशव भांगे यांची प्रमुख उपस्थिती होती.




पुढे बोलताना क्षीरसागर म्हणाले की, आपल्या काळात शैक्षणिक वातावरण आजच्या तुलनेत फारसे प्रभावी आणि परिणामकारक नव्हते. मात्र, अलीकडच्या काळात शिक्षण, संशोधन आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रचंड वेगाने बदल होत आहेत. या बदलत्या परिस्थितीत विद्यार्थ्यांनी स्वतःला अद्ययावत ठेवून ज्ञान, कौशल्य आणि गुणवत्तेच्या बळावर आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली पाहिजे. संधी निर्माण करण्याची ताकद गुणवत्तेत असते. केवळ इतरांच्या आधारावर प्रगती करता येत नाही; स्वतःच्या क्षमतेवर उभे राहण्याची वृत्ती विद्यार्थ्यांमध्ये विकसित झाली पाहिजे.

आरक्षणाच्या भूमिकेबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना ते म्हणाले की, आपण आर-क्षणाचे पुरस्कर्ते आहोत. शासनाने निर्माण केलेल्या विकासाच्या संधी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचल्या पाहिजेत. तळागाळातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे.आज कृत्रिम बुद्धिमत्ता (अख), रोबोटिक्स आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे शिक्षण क्षेत्रासमोर नवी आव्हाने निर्माण झाली आहेत. या बदलांकडे केवळ आव्हान म्हणून न पाहता त्यांचा योग्य वापर करून विद्यार्थ्यांची ज्ञानक्षमता आणि संशोधनवृत्ती विकसित केली पाहिजे. देशाच्या प्रगतीत पारंपरिक १०+२+३+२ शैक्षणिक रचनेचे योगदान महत्त्वाचे राहिले आहे. त्याचबरोबर नवीन शैक्षणिक धोरणातून होत असलेले बदलही भावी पिढीच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकतात. या परिवर्तनातून **पान २ वर**

## मतदार यादी पुनरिक्षणासाठी जालना विधानसभेच्या पालकपदी माजी आमदार कैलास गोरंटयाल यांची नियुक्ती

**लोकनायक वृत्तसेवा –** मतदार याद्यांच्या विशेष सघन पुनरिक्षण (SIR) मोहिमेला गती देण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने जालना विधानसभा मतदारसंघाच्या पालकपदी माजी आमदार कैलास गोरंटयाल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे मतदार यादी पुनरिक्षणाच्या कामात अधिक प्रभावी नियोजन व समन्वय साधला जाणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.राज्यात २६ जूनपासून मतदार याद्यांच्या विशेष सघन पुनरिक्षण (SIR) मोहिमेला प्रारंभ झाला आहे. या



मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी, नियोजन आणि कामाला गती देण्यासाठी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांच्या निर्देशानुसार मराठवाड्यातील सर्व ४६ विधानसभा मतदारसंघांसाठी पालकांची नियुक्ती करण्यात आली आहे.या नियुक्त्यांमध्ये जालना विधानसभा मतदारसंघाच्या पालकपदी माजी आमदार कैलास गोरंटयाल यांची निवड करण्यात आली आहे. तसेच परतूर विधानसभा मतदारसंघासाठी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर, बदनापूर **पान २ वर**

## रावेरमध्ये श्री महाराजा अग्रसेन जयंती महोत्सव उत्साहात; नवनिर्मित डोमचे दिमाखदार उद्घाटन

### महाराष्ट्र प्रदेशअध्यक्ष जितेंद्र अग्रवाल यांच्या हस्ते लोकार्पण

**लोकनायक वृत्तसेवा –** अग्रवाल समाजाचे आराध्य दैवत आणि समाजातील एकता, समता, सेवाभाव व लोककल्याणाचे प्रतीक असलेल्या श्री महाराजा अग्रसेन यांच्या जयंती महोत्सवानिमित्त रावेर येथे विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवाचे औचित्य



साधून समाजासाठी नव्याने उभारण्यात आलेल्या भव्य डोमचे उद्घाटन अखिल भारतीय अग्रवाल संमेलनाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष जितेंद्र अग्रवाल यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वाता-वरणात संपन्न झाले. या सोहळ्यामुळे रावेरच्या अग्रवाल समाजाच्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा रोवला गेला आहे.श्री महाराजा अग्रसेन जयंती महोत्सवाच्या निमित्ताने रावेर येथील महाराजा अग्रसेन भवन परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. समाजबांधवांच्या सहभागातून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला धार्मिक अधिष्ठानाबरोबरच सामाजिक एकात्मता आणि संघटनात्मक बळाची जोड मिळाली. नवनिर्मित डोमच्या उद्घाटनामुळे समाजाच्या सामूहिक उपक्रमांसाठी एक महत्त्वपूर्ण सुविधा उपलब्ध झाली असून, भविष्यात विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि समाजोपयोगी कार्यक्रमांच्या **पान २ वर**

## स्वातंत्र्य सेनानी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालयात बार कौन्सिल सदस्या ॲड. माधवी पोतदार यांचे स्वागत व सत्कार

**लोकनायक वृत्तसेवा –** महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलच्या सदस्या मा. ॲड. माधवीताई पोतदार यांनी स्वातंत्र्य सेनानी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालयास भेट दिली. महाराष्ट्र आणि गोवा सदस्य पदी निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने मा .ॲड . माधवीताई पोतदार यांचे स्वागत व सत्कार




महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेख अनिसूर रहमान व सर्व शिक्षकांच्या वतीने काण्यात आला. सत्काराला उत्तर देताना ॲड. माधवीताई पोतदार म्हणाल्या, 'विधी महाविद्यालयाचे तसेच महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे प्रश्न व अडचणी सोडवण्यासाठी मी बार काऊंसील तर्फे सर्वतोपरी प्रयत्न करील आणि वकील बांधवांच्या प्रगतीसाठी सर्वतोपरी सहकार्य करेल असे आस्वासन दिले .' त्यांच्या या आश्वासनामुळे उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

हा कार्यक्रम महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष मा. आमदार राजेंद्र जगताप साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य तथा वरिष्ठ विधिज्ञ ॲड. के. एस. पंडित, ज्येष्ठ प्रा. एन. एन. साबळे, प्रा. **पान २ वर**

## बेलगाव येथे श्री क्षेत्र रेणुकाई देवीचा शारदीय नवरात्र महोत्सवाला प्रारंभ; विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**लोकनायक वृत्तसेवा –** आष्टी तालुक्यातील बेलगाव येथील आराध्य दैवत श्री रेणुका माता मंदिरात श्री रेणुका मातेच्या कृपाशीर्वादाने सालाबादप्रमाणे यंदाही १८ व्या वर्षी शारदीय नवरात्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. ११ ते २० ऑक्टोबर २०२६ या काल-ावधीत होणाऱ्या या महोत्सवात विविध धार्मिक कार्यक्रम, कीर्तन, जागर आणि महाप्रस-ादाचे आयोजन करण्यात आले



असून, परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त गावकरी मंडळी, बेलगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

या महोत्सवानिमित्त दररोज सायंकाळी ९ ते ११ या वेळेत नामवंत कीर्तनकारांची कीर्तने आणि विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. यामध्ये ह.भ.प. गौरीताई बेलेकर महाराज (आंबीजोगाई), ह.भ.प. समाजप्रबोधनकार वैष्णवीताई सुपेकर, ह.भ.प. रवि महाराज बबन काळे, ह.भ.प. शरद महाराज काळे, ह.भ.प. प्रल्हाद महाराज माळी, ह.भ.प. शिवचरित्रकार बबन महाराज समझकर यांच्यासह विविध कीर्तनकारांच्या सेवांचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवादरम्यान बेलगावसह परिसरातील विविध गावांतील भाविक व दानशूर भक्तांनी अन्नदानासाठी पुढाकार घेतला आहे. सकाळचे व सायंकाळचे अन्नदान तसेच विविध दिवसांच्या **पान २ वर**

## लोकशाही व्यवस्थेत निर्भीड न्यायव्यवस्था व स्वायत्त संवैधानिक संस्था' यावर व्याख्यानमाला!

**लोकनायक वृत्तसेवा –** जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी, बीड जिल्ह्याचे माजी खासदार, पुरोगामी विचारवंत व शोषितांचे लढाऊ नेते कॉ. गंगाधरअप्पा बुरांडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित करण्यात येणाऱ्या १८ व्या पुष्प निमित्ताने विशेष व्याख्यान व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. 'आजच्या लोकशाही व्यवस्थेत निर्भीड न्यायव्यवस्था व स्वायत्त संवैधानिक संस्था - सद्यस्थिती' या अतिशय महत्त्वपूर्ण आणि ज्वलंत विषयावर हा कार्यक्रम होणार असून बुधवार, दि. १४ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजता आद्यकवी मुकुंदराज सभागृह, अंबाजोगाई, जि. बीड येथे हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. या कार्यक्रमात सर्वोच्च न्यायालयाचे निर्भीड व निरपेक्ष मा. न्यायमूर्ती श्री. अभय ओक हे प्रमुख उप-स्थिती म्हणून लाभणार आहेत. मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती मा. न्यायमूर्ती श्री. रविंद्र बोर्डे आणि निवृत्त न्यायमूर्ती मा. न्यायमूर्ती श्री. पुरुषराम बोरा हे या विशेष व्याख्यानमालेस उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. आजच्या लोकशाही व्यवस्थेपुढील आव्हाने आणि न्यायव्यवस्था यावर या व्यासपीठावरून परखड विचार मांडले जाणार आहेत.या कार्यक्रमा दरम्यान महाराष्ट्र व गोवा वकील परिषदेचे विद्यमान अध्यक्ष ॲड. जयंत जायभाये तसेच माजी अध्यक्ष व विद्यमान सदस्य ॲड. **पान २ वर**

## बीड जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत भगिनी निवेदिता कन्या विद्यालयाच्या पाच मुलींची ऐतिहासिक भरारी!

### शिवांजली कर्डिले, सानिका सावंत, श्रेया औटे, कोमल रोमाडे आणि वैष्णवी कुलकर्णी यांचा जिल्ह्यात प्रथम क्रमांक; विभागीय स्पर्धेसाठी निवड

**लोकनायक वृत्तसेवा –** बीड जिल्हास्तरीय १७ वर्षांखालील बॅडमिंटन स्पर्धेत कडा येथील लहुजी वस्ताद शिक्षण प्रसारक मंडळ संचलित भगिनी निवेदिता कन्या विद्यालयाच्या पाच विद्यार्थिनींनी शानदार कामगिरी करत



जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. कु. शिवांजली वाल्मिक कर्डिले, कु. सानिका शहादेव सावंत, कु. श्रेया अशोक औटे, कु. कोमल सतीश रोमाडे आणि कु. वैष्णवी जालिंदर कुलकर्णी या पाच खेळाडूंनी आपल्या खेळातील कौशल्य, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर विद्यालयाचे नाव जिल्हास्तरावर उज्ज्वल केले. या यशामुळे त्यांची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली असून, कडा परिसरातून या गुणवंत मुलींचे अभिनंदन केले **पान २ वर**




सालाबाद प्रमाणे दमा-श्वास-कफ-खोकला-सदी-ॲलजी-
जुना दमा - मुळव्याध, आम्लपित्त

यावर रामबाण प्रभावी औषध

प्रति वर्षा प्रमाणे कोजागिरी पोर्णिमा दिनांक २५/१०/२०२६ रविवार रोजी रात्री १२ वाजता औषध घेणे. पहिल्या माळेपासून औषध वाटप चालू आहे.


श्री. प्रभाकर भानूदास महाराज (गुरव)

औषध पार्सल घरी घेवून जाणे नावे नोंदणी चालू आहे.

संपर्क
श्री. प्रभाकर भानुदास महाराज (गुरव)
कनकालेश्वर मंदिर, बीड. पुजारी बीड
मो. ९८६०६५२२५१







This newspaper printed by owner printer publisher editor Bharat Devdas Gaikwad chief editors Abhijeet Gaikwad at indradhanush printers and publishers near post office paid bid Kharagpur Beed 431122 Maharashtra and published at the office of Dainik loknayak near Kharagpura beed 431122 Maharashtra

हे पत्रक मालक मुद्रक प्रकाशक संपादक भारत देविदास गायकवाड कार्यकारी संपादक अभिजीत गायकवाड यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स अँड पब्लिशर्स पोस्ट ऑफिस जवळ पेठ बीड खडकपुरा बीड जिल्हा बीड ४३ ११ २२ महाराष्ट्र येथे छापून दैनिक बीडचा लोकनायक कार्यालय पोस्ट ऑफिस जवळ पेठ बीड खडकपुरा बीड जिल्हा बीड ४३ ११ २२ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले निवासी संपादिका नायरा राज मुळे पी आर बी कायद्यानुसार सर्व वादविवाद बीड न्याय कक्षेत मोबाईल नंबर ९८ ५० १६ ५० ८२ / ९४ २० ४०६०१९ email- dainikloknayak@gmail.com